पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता

पुणे महानगरपालिका
सभेचा वृत्तांत ( सभा क्रमांक १३ )
मंगळवार, दिनांक १०/५/२०२२, दुपारी ३.३५ वाजता

पुणे महानगरपालिकेची मासिक (स्थगित) सभा (माहे डिसेंबर २०२१ च्या कार्यपत्रिकेवरील कामकाजासाठी प्रथम दिनांक १७/१२/२०२१ रोजी बोलविलेली) महानगरपालिकेच्या मा.महापालिका आयुक्त कार्यालयातील सभागृहात भरली होती.

सदर सभेस खालील मा.अधिकारी उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मा. विक्रम कुमार,भा.प्र.से. | – | प्रशासक तथा महापालिका |
| २) | मा. राजेंद्र मुठे | – | उपायुक्त (दक्षता व मालमत्ता व्यवस्थापन) |
| ३) | मा. श्रीनिवास कंदुल | – | मुख्य अभियंता (विद्युत) |
| ४) | श्री. शिवाजी दौंडकर | – | नगरसचिव |

**मा. विक्रम कुमार, भा.प्र.से, महापालिका आयुक्त तथा प्रशासक, पुणे मनपा हे सभापती म्हणून अध्यक्षस्थानी होते.**

**मा. प्रशासक :** सभा सुरु करावी.

**नगरसचिव :** माहे डिसेंबर २०२१ कार्यपत्रिका. मा.सभापती/प्रशासक यांनी विषय घेण्याचे आदेश दिले आहेत.

**विषय क्र. ६१४**

सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक 'अ' चे रक्कम रुपये ५९,०९,३०,००,००० व अंदाजपत्रक 'क' चे रक्कम रुपये १४,८०,७०,००,००० असे आरंभीच्या शिलकेसह रक्कम रुपये ७३,९०,००,००,००० चे अंदाजपत्रका बाबत मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/मुले/७४३ दि.२५/१०/२०२१ चे पत्र.

**ठराव क्रमांक :- ३०**

**संदर्भ :-** १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/७४३ दि. २५/१०/२०२१ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१४६७ ,दि.२३/११/२०२१

-----

**मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून-**

**सन 2020-21 चे अंदाजपत्रक 'अ' चे रक्कम रुपये 59,09,30,00,000 व अंदाजपत्रक 'क' चे रक्कम रुपये 14,80,70,00,000 असे आरंभीच्या शिलकेसह रक्कम रुपये 73,90,00,00,000 चे अंदाजपत्रकास मा. मुख्य सभेने मंजुरी दिली होती. हिशोबान्ती जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :**

**अंदाजपत्रक 'अ'**

**जमा बाजू**

| | | |
|---|---|---|
| 1 | दिनांक 1 एप्रिल, 2020 ची शिल्लक | 1,00,000 |
| 2 | सन 2020-21 मधील जमा | 38,03,21,46,475 |
| 3 | आरंभीच्या शिलकेसह जमा | 38,03,22,46,475 |

**खर्च बाजू**

| | | |
|---|---|---|
| 1 | सन 2020-21 मधील खर्च | 51,06,77,44,036 |
| 2 | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | 1,00,000 |
| 3 | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | 51,06,78,44,036 |
| 4 | वर्षात येणारी तूट | 13,03,55,97,561 |
| 5 | वॉर्डस्तरीय कामे पूर्ण करण्याकरिता मुदतवाढ दिल्याने ओढून घ्यावयाची रक्कम (2020-21 मधील अप्रत्यक्ष खर्च) | 14,81,70,765 |
| 6 | अंदाजपत्रकाची 'अ' ची सन 2020-21 ची एकूण तूट | 13,18,37,68,326 |

**अंदाजपत्रक ‘क’**

**जमा बाजू**

| | | |
|---|---|---|
| 1 | दिनांक 1 एप्रिल, 2020 ची शिल्लक | 1,00,000 |
| 2 | सन 2020-21 मधील जमा | 9,09,98,08,139 |
| 3 | आरंभीच्या शिलकेसह जमा | 9,09,99,08,139 |

**खर्च बाजू**

| | | |
|---|---|---|
| 1 | सन 2020-21 मधील खर्च | 13,22,94,45,794 |
| 2 | अधिनियमानुसार ठेवावयाची शिल्लक | 1,00,000 |
| 3 | वर्षाअखेरीच्या शिलकेसह खर्च | 13,22,95,45,794 |
| 4 | अंदाजपत्रकाची 'क' ची सन 2020-21 ची तूट | 4,12,96,37,655 |

| | | |
|---|---|---|
| 1 | अंदाजपत्रकाची 'अ' ची सन 2020-21 ची तूट | 13,18,37,68,326 |
| 2 | अंदाजपत्रकाची 'क' ची सन 2020-21 ची तूट | 4,12,96,37,655 |
| 3 | अंदाजपत्रकाची 'अ' व 'क' ची सन 2020-21 ची तूट | 17,31,34,05,981 |

**सन 2020-21 चे हिशोबामध्ये रक्कम रुपये 17,31,34,05,981 इतकी तूट येत आहे. तरी खालील निधीतून कामे पूर्ण होऊन शिल्लक असलेल्या रकमेतून खालीलप्रमाणे तूट समायोजित करण्यात आलेली आहे.**

| | निधी | |
|---|---|---|
| 1 | भांडवली निधी | 8,89,06,00,000 |
| 2 | पाणीपुरवठा + गटारे व नाले निधी | 1,59,85,00,000 |
| 3 | पाणीपुरवठा + गटारे व नाले प्रकल्प निधी | 3,21,45,00,000 |
| 4 | सार्वजनिक वाहतूक सुधारणा निधी | 1,66,22,00,000 |
| 5 | भूमी संपादन निधी | 1,14,47,00,000 |
| 6 | युवक कल्याणकारी योजना निधी | 48,37,00,000 |
| 7 | यंत्रसामुग्री घसारा निधी | 31,92,05,981 |
| | | |
| | एकूण | 17,31,34,05,981 |

तरी सदरच्या जमाखर्चास **मान्यता देण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ६१४ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ६४३**

स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा हिस्सा पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेबाबत, मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/उपआ (विशेष)/ ८८६, दिनांक २३/११/२०२१ रोजीचे पत्र.

**ठराव क्रमांक :– ३१**

**संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/उपआ (विशेष)/८८६दि.२३/११/२०२१ चे पत्र.**
**२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१५५० ,दि.२३/११/२०२१**

----

**मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –**

**स्मार्ट सिटी अभियानासाठी पुणे महानगरपालिकेचा हिस्सा पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना अदा करणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्यात येत आहे.**

**१) पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांना उर्वरित देय र.रू.३०.५० कोटी रकमेपैकी र.रू.१० कोटी सन २०२१–२२ या आर्थिक वर्षात FE50A104 या अर्थशिर्षकामधून अदा करणेस व शिल्लक र.रू.२०.५० कोटी ही उपलब्धतेनुसार अदा करणेस.**

**२) सदरची रक्कम पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांचे नावाने धनादेशाने अदा करणेस.**

**निर्णय :– विषय क्र. ६४३ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ६८०**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३)(क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने वैकुंठ स्मशानभूमीमध्ये मे. NEERI यांचेमार्फत विकिसत करण्यात आलेली वायुप्रदुषण नियंत्रण यंत्रणा प्रायोगिक तत्वावर बसविणेबाबत, मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/विद्युत/९३६, दि.०६ /१२/२०२१ चे पत्र.

**ठराव क्रमांक :– ३२**

**संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/विदयुत/९३६ दि. ६/१२/२०२१ चे पत्र.**
**२) स्थायी समिती ठराव क्र.१६५९ ,दि.१४/१२/२०२१**

**-----**

**मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३) (क) मधील तरतुदीच्या अनुषंगाने वैकुंठ स्मशानभूमी मध्ये मे NEERI यांचेमार्फत विकिसत करण्यात आलेली वायुप्रदुषण नियंत्रण यंत्रणा प्रायोगिक तत्वावर बसविणे हे काम मे. NEERI यांचेकडून र.रू.२,१८,३००/– पर्यंत (जी.एस.टी.सह ) पर्यंत काम करून घेणेस, झालेल्या कामांचे बिल अदा करणेबाबतची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेत आल्याची नोंद घेण्यात येत आहे.**

**निर्णय :– विषय क्र. ६८० संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

**विषय क्र. ७०४**

पुणे शहरामध्ये कोविड–१९ साथीचा अटकाव होण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिका बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयातील ई.एस.आय.सी. हॉस्पीटलमधील औषध खरेदीच्या बिलाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)(क) अन्वये मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र./मआ/आरोग्य/९७७, दि.१३ /१२/२०२१ चे पत्र

**ठराव क्रमांक :– ३३**

**संदर्भ :–१)मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/९७७,दि.१३/१२/२०२१ चे पत्र.**
**२) स्थायी समिती ठराव क्र.१६८४,दि.१४/१२/२०२१**

**----**

**मा.महापालिका आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –**

**पुणे शहरामध्ये कोविड–१९ साथीचा अटकाव होण्याच्या दृष्टीने पुणे महानगरपालिका बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयातील ई.एस.आय.सी.हॉस्पीटल येथील सुमारे १०० बेडस् कोविड–१९ या साथीने बाधित रूग्णाच्या उपचारासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यापैंकी ८० ऑक्सीजन बेडस व २० आय.सी.यु.बेडस यांचे नियोजन करण्यात आले होते. १०० बेडसच्या रूग्णाची औषधे व रूग्ण उपयोगी साहित्य हे प्रथमत:औषध भांडार गाडीखाना,पुणे येथे मागणी करण्यात आले होते. परंतु रूग्णाच्या औषधांची मागणी तातडीची बाब असल्याने व आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्याने पुणे महानगरपालिकेच्या मध्यवर्ती औषध भांडार येथील खरेदी नियम व दरानुसार मे.नमो फार्मो, बिबवेवाडी–कोंढवा रोड, पुणे यांचेकडून महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७.३(क) अन्वये खरेदी करण्याची मान्यता देण्यात आली होती.**

**मे.नमो फार्मो यांनी दिनांक १४/४/२०२१ पासून २०/६/२०२१ पर्यंत ई.एस.आय.सी.हॉस्पीटल बिबवेवाडी पुणे मधील डॉक्टरांनी दिलेल्या प्रीस्क्रीपशननुसार २४ तास विनाखंडित औषधांचा व रूग्ण उपयोगी साहित्याचा रक्कम रूपये ३७,८६,७१४/– पर्यंत पुरवठा व्यवस्थितरित्या केला आहे.**

**वरील बाब मा.मुख्य सभेच्या अवलोकनार्थ सादर करण्यात आल्याची नोंद घेण्यात येत आहे.**

**अर्थशिर्षक सन २०२१–२२**

**RE17F258**

**कोविड–१९ अंतर्गत अत्यावश्यक महसुली कामासाठी खर्च**

**निर्णय :– विषय क्र. ७०४ संमत झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी प्रकट केले.**

मा.सभापती/प्रशासक : आजची सभा गुरुवार, दिनांक १९/५/२०२२ रोजी, सकाळी ११.१० वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे कामकाज होऊन सभा तहकुब झाल्याचे मा.सभापती/प्रशासक यांनी जाहीर केले.

स्वाक्षरी /-xxx
शिवाजी दौंडकर,
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

*******

दि. १९-०८-२०२२ च्या सभेत वृत्तांत कायम केला.

स्वाक्षरी /-xxx

प्रशासक, पुणे म.न.पा.

**********